नियमित दिवाणी दावा क्र.३१/२०१७
नि.क्र.५५/ क (सोबत)

प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.४

**उलटतपास वादीतर्फे वकील श्री. यु.एस. जाधव यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

१. प्रतिवादी क्र.२ ज्ञानोबाची पत्नी म्हणजेच प्रतिवादी क्र.६ ही माझी सख्खी बहीण आहे. मन्नूर येथे झालेली वाटणीपत्र हे नोंदणीकृत नाही. सुवर्णा व स्नेहा यांनी प्रत्येकी पाच लाख रुपये घेऊन हक्क सोडलेबाबत काही कागदपत्र करुन दिले नाही. सुवर्णा व स्नेहा यांना पाच लाख रुपये दिल्याबाबत माझ्याकडे लेखी पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.४ सुनंदा ही प्रतिवादी क्र.६ ची नणंद आहे. वाटणी होण्याअगोदर मन्नूर येथे एकुण २२ एकर जमीन वडोलोपार्जित व १६ एकर जमीन खरेदीची होती. २०१० मध्ये वाटणी होत असताना सुवर्णा व स्नेहा यांना प्रत्येकी पाच लाख देऊन त्यांनी हक्क सोडलेबाबत वाटणीपत्राचा दस्त आम्ही केलेला नाही. सदर वाटणीचा फेर झालेला नव्हता. साक्षीदार सांगतो की, अंशतः फेर झालेला आहे. सदर फेर माझ्या मोठ्या भावाने बक्षीसपत्र करुन दिल्याने झाला होता. मला सदर दाव्यातील वादाबाबत निश्चीत माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सुवर्णाच्या नावावर असलेली जमीन वाटणी होऊ नये म्हणून मी आज साक्ष देत आहे. माझा भाचा प्रतिवादी क्र.७ यांनी घेतलेल्या जमिनीबाबत मला माहिती नाही. सुवर्णाच्या नावाने खरेदी घेतलेल्या जमिनीचा संपूर्ण तपशील मला माहिती नाही. सुवर्णा हिला पाच लाख कोणत्या तारखेला दिले होते हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सुवर्णा व स्नेहा यांना प्रत्येकी पाच लाख रुपये दिल्याचे व त्यांनी हक्क सोडल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सुवर्णा हिने सदर रकमेतून जमीन खरेदी घेतल्याचे मी खोटे सांगत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2025.07.02 16:57:53 +0530

दि.०२/०७/२०२५

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.